# महाराष्ट्र सिंचन विकास

सिंचन, संशोधन व विकासासंबंधी माहिती देणारे त्रैमासिक

खंड - २७
अंक - ३ रा
एप्रिल
मे
जून
२०१३





# महात्मा गांधी यांच्या प्रेरणेतून शेतकऱ्यांनी ग्रामविकासाची योजना अंमलात आणावी

*- पद्मश्री डॉ. श्री. भंवरलाल जैन*


*वाकोद, ता. जामनेर, जि. जळगाव येथे जन्म झालेला भूमीपुत्र म्हणजे वयाचे अमृतमहोत्सवी वर्ष नुकतेच पूर्ण करणारे जैन इरिगेशन, जळगावचे अध्वर्यू पद्मश्री डॉ. भंवरलाल जैन उपाख्य 'भाऊ', ज्यांना राज्यातच नव्हे तर संपूर्ण विश्वात एक यशस्वी उद्योजक म्हणून व एक समर्पित समाजसेवक म्हणून ओळखले जाते. वकिलीचे शिक्षण पूर्ण करूनही शब्दांच्या तुषांराऐवजी जलतुषार सर्वदूर पोहोचविण्यासाठी इ. स. १९८८ पासून राज्याच्या ग्रामीण भागाला ठिबक सिंचन व तुषार सिंचनाची ओळख करून देणाऱ्या, प्रगतीकडे वळणाऱ्या शेतकऱ्यांना / संस्थांना / कलावंतांना पदरमोड करून पुरस्कार देणाऱ्या भाऊंची मुलाखत सूक्ष्म सिंचन क्षेत्रातील आणि जैन हिल्सवर करण्यात आलेला पाणलोट क्षेत्र विकास हा केंद्रबिंदू ठेवतानाच शेतकऱ्यांच्या सर्वंकष उन्नतीसाठी निरोगी जमीन, दर्जेदार बियाणे, उत्तम खत आणि अद्ययावत तंत्रज्ञान आणि पारंपरिक अनुभव यांचा समन्वय ठेवून भू-जल-पीक व्यवस्थापन करून शेती पिकवायलाच हवी, परंतु त्याचसोबत शेतकऱ्यांचे मनोबल उंचावणे, उद्योजकतेचे अर्थकारण त्याला परिपूर्ण समजेल अशी व्यवस्था करणे, अत्याधुनिक तंत्राशी त्याचे नाते जोडणे हे देखील महत्त्वाचे असल्याने शेती, उद्योग व मानसशास्त्रीय भूमिकेतून भाऊंशी साधलेला हा संवाद होय.*

*आजवर एकूण २२ आंतरराष्ट्रीय पुरस्कार, भारताच्या तत्कालीन महामहीम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांचेकडून 'पद्मश्री' पुरस्कारासह अनेक राष्ट्रीय पुरस्कार, विविध राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय संस्थांचे असंख्य पुरस्कारांचे मानकरी, वाकोद गावाला नवे रूप देणारे समाजसेवक, जळगावच्या उजाड डोंगरांनाही हिरवी गाणी म्हणायला लावणारे सृजक, कांदा निर्जलीकरण, फळप्रक्रिया, सौर ऊर्जा इत्यादी अनेक घटकांचे यशस्वी उद्योजक तसेच निस्सीम गांधीवादाचे वाहक व प्रसारक भाऊ यांची सहायक संपादक श्री. प्रशांत आडे यांनी घेतलेली ही मुलाखत वाचकांना निश्चितच आवडेल अशी आमची खात्री आहे.*

जैन हिल्सच्या प्रवेशद्वारातून आत शिरल्यावर इथल्या शिस्तीची ओळख विनम्रतेने करून देणारे सुरक्षा गार्ड यांची आपली प्रथम भेट होते. तिथेच आपण नियोजनाने आलो असू तर आपल्याला एक जिव्हाळ्याचा सहकारीही इथेच आपल्या परिवाराचा सदस्य होतो. जैन हिल्सचा प्रवास या सहकाऱ्यांच्या दिशादर्शनाने आरंभ होतो, ती इमारत म्हणजे **'परिश्रम'**. साहित्यिकांच्या ग्रंथशीर्षकांनाही लाजवेल अशी नावे इथे दिसायला सुरुवात होते.

उजाड डोंगरांना आजचा हिरवाईचा अंगरखा प्रदान करण्यासाठी परिश्रम घेतलेल्या साऱ्या घटनांची माहिती देणारी ही वास्तू. परिश्रमाला फळ असणारच ना! त्यामुळे या वास्तूत विस्तीर्ण हॉलमध्ये जैन इरिगेशनच्या विविध उपक्रमांना राज्य, राष्ट्रीय व जागतिक स्तरावरून



लाभलेले पुरस्कार, सन्मानचिन्हे क्षणचित्रांसह इथे पहावयास मिळतात. या इमारतीच्या बाहेरच ठिबक तुषारचे प्रात्यक्षिक पहावयास मिळते. दिवसातून किमान २५ वेळा प्रात्यक्षिक दाखवूनही पाटील नावाचा इथला कर्मचारी आपल्याला मानाचा पाहुणा म्हणूनच वागवतो.

परिश्रम इमारतीजवळचा चौक ओलांडला की भरपूर लांबीची एक इमारत आपले वक्ष वेधून घेते. **'गुरुकुल'** हे नाव दिलेली हीच ती सुसज्ज इमारत. जिथे जैन हिल्सवर आलेल्या जिज्ञासूंची प्रशिक्षणे अव्याहतपणे चालू असतात. इमारतीच्या स्वागत कक्षात आपण पोहोचलो की 'अप्पणा सच्चमेसेज्जा मेत्ति भूएसु कप्पए' अर्थात स्वत:च सत्याचा शोध घ्या आणि सर्वांशी मैत्री करा, या अर्थाचे पाली भाषेतील एक सुंदर वचन अर्थासह आपणास वाचायला मिळते. विद्या शिकू इच्छिणाऱ्यांची निवासाची सोय जिथे आहे, त्या इमारतीला 'गुरुकुल' या पेक्षा दुसरे कोणते नाव सार्थ असणार!



विशेष म्हणजे महाराष्ट्रासह गुजरात, राजस्थान, पंजाब, हरियाणा, बिहार, हिमाचल प्रदेश, तामिळनाडू, केरळ, उत्तराखंड, प. बंगाल, आंध्र प्रदेश, कर्नाटक, मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओरिसा, झारखंड आणि उत्तर प्रदेशातून येथे प्रतिनिधी, तज्ज्ञ येतात. गेल्या वर्षभरात सुमारे ६०६०२ जणांनी जैन हिल्सला भेट दिली आहे, तर वर्ष २०१३ च्या जानेवारी व फेब्रुवारी या केवळ दोनच महिन्यात भेटकर्त्यांची संख्या १२१२४ एवढी आहे. ही आकडेवारी लक्षात घेता इथल्या वैविध्यपूर्ण व अद्ययावत तंत्रज्ञानाने बहरलेल्या प्रकल्पांचे, पाणलोट क्षेत्राचे आणि त्याबाबत माहिती विनम्रपणे देण्याचे वैशिष्ट्य व महत्त्व ध्यानात येते.



**आपण मुलाखत देण्याचे मान्य केल्याबद्दल संचालनालयाच्या वतीने आपली कृतज्ञता प्रारंभीच व्यक्त करतो. आपण वयाची ७५ वर्षे पूर्ण केलीत. अमृत महोत्सवी वर्ष पूर्ण केलंत. आपल्या कार्याचे वर्णन करावयाचे झाल्यास ते देखील अमृतमयी असल्याने आपले व्यक्तिश: व जलसंपदा खात्यातर्फे अभिनंदन करतो. जीवेत् शरद: शतम् !**

धन्यवाद. माझ्या कार्याचा आरंभ महाराष्ट्र राज्यातून असल्याने व सिंचन त्रैमासिकाच्या वतीने प्रथमच आपण मुलाखतीसाठी आल्याने आपलेही आपल्याच जैन हिल्सवर मी स्वागत करतो.

**केवळ जळगाव नाही, केवळ महाराष्ट्र नाही तर अवघ्या जलक्षेत्रात आपणास आदराने भाऊ म्हणून ओळखलं जातं, संबोधलंही जातं, तेव्हा भाऊ आपली संमती असल्यास संवादाला आरंभ करू या?**

नक्कीच.

**विसाव्या शतकातील थोर तत्त्वज्ञ डॉ. पारनेरकर महाराज यांचा अभंग आहे की, 'कामासाठी ज्याचे । मन हे प्रसन्न । सार्थकी जीवन । लागे त्याचे । कामाचा विश्वास । काळाचा अभ्यास । तयाचे साहस । भाग्य आणी ।।' जैन इरिगेशनच्या कामाचे आजचे विशाल, व्यापक स्वरूप पाहता या साऱ्या कार्यामागे आणि अर्थात यशामागे एक निश्चित असे जीवन तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान असल्याची मला अनुभूती येते. Life is work and Work is Life हे घोषवाक्य कार्यकर्त्यांच्या मनात बिंबविणाऱ्या, जैन इरिगेशनकडून प्रकाशित होणाऱ्या प्रत्येक ग्रंथात Mission, Vision, Goal शिलालेखासारखा कोरणाऱ्या आपल्या आभाळ उंचीच्या कर्तृत्त्व मनोऱ्याचा पाया कोणत्या तत्त्वावर उभा राहिला आहे?**

मी असं मानतो की, माझ्या व्यक्तिमत्त्वामध्ये तीन गोष्टींचा समावेश आहे. पहिली गोष्ट म्हणजे उद्योग व्यवसाय. उद्योग व्यवसाय म्हटला की त्यात दोन पैसे मिळायला पाहिजेत हे ओघाने आलेच. दुसरी गोष्ट, जी माझ्यासाठी अधिक महत्त्वाची आहे ती म्हणजे सामाजिक बांधिलकी. उद्योग व्यवसाय आधी की सामाजिक बांधिलकी आधी असा तरतम भाव माझ्याकडे नाही. सामाजिक बांधिलकीमध्येच माझा उद्योग व्यवसाय सामावलेला आहे. त्याहून तो वेगळा नाही असे मी मानतो. उलट सामाजिक बांधिलकी याचेच दुसरे नाव म्हणजे माझा उद्योग व्यवसाय होय. तिसरी गोष्ट जी मला नेहमी घेरून ठेवते, जी मला वेढून आहे, ती म्हणजे पर्यावरण. अर्थातच पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन आणि त्याची पाठराखण. या तीन गोष्टींकडे आपण पाहिलं तर आजवर जे काही घडलं, त्याचा उगम या तीनपैकी एकात, किंवा दोहोत तुम्हाला आढळेल. दुसरं काही केलेलंच नाही आणि दुसरं काही जमलं असतं का नाही हे मला नाही सांगता येणार. पण एक नक्की की हे मात्र मला जमलं आहे.



**माझ्या माहितीप्रमाणे आपले एकूण २९ प्रकल्प आज विश्वभरात असून त्यापैकी १४ भारतात व १५ भारताबाहेर आहेत. हे सर्वच प्रकल्प मोठे आहेत, विशाल आहेत. मी इथे आलो आणि अनेक निरनिराळ्या हुद्यावरच्या, स्तरावरच्या आपल्या सहकाऱ्यांना भेटलो. मग ते प्रशिक्षक श्री. बी. डी. जडे, किशोर कुलकर्णी, गिरीश कुलकर्णी, गुरुकुलचे श्री. पवार इ. कुणीही असतील, ज्या ज्या माणसांना मी भेटलो त्या सर्वांच्या हृदयात भाऊ म्हणजे आपल्या कुटुंबातील एक ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व अशीच भावना आहे. हा प्रश्न मी जाणीवपूर्वक विचारतोय की हे वातावरण निर्माण होण्यामागची आपली भूमिका कोणती? शासकीय असो वा खासगी कुठल्याही क्षेत्रात विकासाचे प्रशिक्षण देऊनही हे गुण आढळतातच असे नाही. त्यांच्या मनात एक बाब रुजली आहे आणि ती म्हणजे 'मी माझ्या कामाचा मालक आहे.' ह्या यशाचा मंत्र कोणता?**

खरं म्हणजे जैन इरिगेशन हे एक मोठं कुटुंबच आहे. अनेक माणसं कंपनीत अनेक ठिकाणी काम करतात. सर्वसाधारणत: देशात आणि परदेशातही दहा हजार माणसे काम करतात. ही दहा हजार माणसे आपापल्या अपेक्षा बाळगून आहेत. सर्वांच्या सर्वच अपेक्षा मला समजणे अशक्यप्राय आहे. माझ्यापर्यंत त्या पोहोचणार नाहीत. तेव्हा माझे कर्तव्य हे आहे की, त्यांच्या गरजा ओळखून त्यांचे पालनपोषण केले पाहिजे. त्यांनी सांगण्याअगोदर केले पाहिजे, तरच मी वडीलकीच्या भावनेने ही कंपनी चालवितोय असे मला म्हणता येईल.

ही जी वडीलकीची भावना आहे, तिथे मुलांनी मागण्याअगोदरच वडिलांनी द्यायचं असतं. त्यांना काय द्यायचं? पैसे तर सर्वच देतात, त्यात काही विशेष नाही. कारण तो मोबदलाच आहे. पण पैशापेक्षा काही वेगळं देता येतं का? त्याचे उत्तर माझ्याकडे 'होय' असेच आहे. मला असं वाटतं की या गोष्टीचे महत्त्व सर्वांनाच असतं. केवळ पैशालाच किंमत देणाऱ्यांना वाटू शकेल की पैशापेक्षा दुसरं काय महत्त्वाचं असणार? या तात्त्विक, वैचारिक गप्पांना काय अर्थ आहे? तर मी म्हणेन मला अशा प्रकारचा अनुभव नाही. मला जो प्रदीर्घ असा आजवरचा अनुभव आहे तो असा की, माणसाला जो पैसा दिला जातो, त्याहून त्याला दिल्या जाणाऱ्या वागणुकीचे महत्त्व निश्चितपणे अधिक आहे.



इथला प्रत्येक माणूस आपण म्हणता तसा खरंच त्याच्या कामाचा मालक आहे. कंपनीचा भागधारकही आहे. माझ्याजवळ दहा असतील म्हणून मी मोठा झालो आणि त्यांच्याजवळ एक आहे म्हणून तो लहान आहे असे नव्हे. या नात्याने आम्ही दोघेही भागधारक आहोत, एकमेकांचे सहकारी आहोत. एक वेळ माझ्याखेरीज ही कंपनी चालू शकेल, परंतु त्यांच्याखेरीज ही कंपनी चालू शकणार नाही. त्यामुळे मी नेहमी वडिलकीच्या भावनेनेच वागत आलोय. या दोहोंचा संगम झाल्यामुळे आपणाला जसा अनुभव आला तद्वत इथल्या प्रत्येक सदस्याला एवढेच तपासून घ्यायचे असते की, मी माझ्या कामाचा मालक आहे. मग मी मालक असल्याप्रमाणे वागतो की नाही? पुढे प्रश्न असा उपस्थित होतो, की मालक कसा वागतो? घराचा मालक घरात कुठलीही बाब वाया जाऊ देत नाही, घरातून बाहेर जाताना तो विजेचे दिवे मालविण्याची, नळाची तोटी बंद करण्याची काळजी घेतो, घरात कुठेही अस्वच्छता त्याला सहन होत नाही, प्रसंगी तो कोणतेही काम आपल्या घरासाठी करतो. हाच घराचा मालक मात्र एकदा का घराच्या बाहेर पडला की हे काम माझे नाही म्हणून जबाबदारी कुणावर तरी भिरकावून बिनदिक्कत पुढे जातो. हे घडू नये. ही कंपनी आपलीच आहे. हा भाव परिवारातील साऱ्या सदस्यांच्या हृदयात सदैव जागृत असावा म्हणून माझा सक्रीय प्रयत्न राहिला आहे. त्यामुळेच इथे कुठल्याही प्रकारचे बंधन नाही. कोणत्याही कामाचे वॉटरटाईट कंपार्टमेंट नाही. याला आपण इथले वैशिष्ट्य म्हणू शकता किंवा आमच्या कंपनी परिवाराची परंपरा. आणि ईश्वरकृपेने माझ्या हृदयातील या संदेश या हृदयीचे त्या हृदयी अर्थात सर्व सदस्यांपर्यंत पोचला आहे, हीच माझ्या समाधानाची बाब होय.

सर्वजण जबाबदारीतून वागतात म्हणूनच कंपनी चढत्या क्रमाने प्रवास करीत आहे. अन्यथा १०००० लोकांवर नियंत्रण ते काय ठेवणार? किती नियम करणार? किती कायदे करणार? किती प्रोसेडिंग्ज ठेवणार? दुसरा भाग असा की या सगळ्यांमध्ये जी शक्ती, वेळ आणि पैसा खर्च वाया जातो, तो यांच सदस्यांना सानंद द्यायला काय हरकत आहे, हाच जैन इरिगेशनचा विचार व आचार. एक रुपया वसूल करण्यासाठी सत्तर पैसे खर्च करायचे व तीस पैसे त्यांना देण्याचा बडेजाव करायचा, यापेक्षा मी असं म्हणेन की हे तीस पैसे ज्यांना द्यायचे आहेत, त्यांना आधीच देऊन मोकळे व्हा ना! हीच उद्योजकता आहे.

**आपण म्हणालात की आमची कंपनी हे कुटुंब आहे. आपली चार मुले म्हणजे श्री. अशोकजी, अनिलजी, अजितजी व अतुलजी हा आपला चतुर्विध पुरुषार्थ ठरावा अशा पद्धतीने आज अष्टभुजांनी जैन इरिगेशनला साता समुद्रा पल्याड नेत आहेत. दर्जाच्या आधारे कष्टाने कंपनीस मोठे व लोकप्रिय करीत आहेत. आपली कामाची पद्धत पाहिल्यास मॉर्निंग वॉकच्या वेळी नातवांसोबत चालतानाही महत्त्वाचे निर्णय हातावेगळे करणारे आपण तिसऱ्या पिढीवर सहज संस्कार करीत काम आणि कुटुंब या दोन बाबी एकजिनसी आहेत हेच सिद्ध करते. आपला ग्रंथ 'ती आणि मी' पाहता सहचारिणीच्या योगदानाच्या वाहिलेले हे अपूर्ण आणि अभिनव असे अर्घ्य ठरते.**

**या पार्श्वभूमीवर आमच्या शेतीप्रधान देशात शेती बहरत असे, ती कुटुंबाच्या एकोप्यावर, एकजिनसी-पणावरच. ग्रामीण भागात तर 'शेतात खत, गावात पत आणि घरात एक मत असेल तर तेथे काय कमी' अशी म्हणही प्रचलित होती. परंतु आज पाश्चात्य सभ्यतेची जीवनशैली कमालीच्या अंधानुकरणाने स्वीकारून आपण आपली कुटुंब व्यवस्था मोडकळीस आणली. अगदी ग्रामीण भागापर्यंत हे लोण पसरले आहे. नात्याची वीण तुटायला लागली आहे. आजच्या शेतीवर याचा विघातक किंवा प्रतिकूल परिणाम झाला आहे, असे आपणास वाटते काय?**

माझ्या कुटुंबाबद्दल आपण जे बोलला आहात, ते अगदी खरे आहे. त्यामागील वैचारिक अधिष्ठानाबद्दल सांगावयाचे झाल्यास आमची कार्यसंस्कृती काय आहे तर, काम हे जीवन आहे व जीवन हे काम आहे. त्यामुळे या दोहोंची फारकत करण्यास आम्ही तयारच नाही. त्यामुळे आपण जो आमच्या कुटुंब जीवनाचा आणि कामाचा समन्वय लावला, तो यथायोग्यच आहे. परंतु याउलट आम्हाला अनेकदा जीवनात कामाशिवाय काही नाहीच का अशा प्रकारचेही प्रश्न विचारले जातात. याचे उत्तर काय द्यावे असा कधी कधी प्रश्न पडतो. आम्ही काम असंच करतो की जे आम्हाला आवडतं. आणि जे आवडतं तेच करतो. हाच दृष्टिकोन आपण जर कुटुंबाबद्दल ठेवला तर आजची आमची शेतीची उत्पादकता आहे किंवा इंग्रजीत जिला आपण प्रॉडक्टिव्हिटी म्हणूया त्यात कमालीचा सकारात्मक, वाढता फरक पडू शकतो.

अविभक्त किंवा संयुक्त कुटुंब पद्धती हा भारतीय संस्कृतीचा कणा आहे, तर विभक्त कुटुंब पद्धती ही पाश्चात्य सभ्यता आहे. या दोन्हीपैकी कशाची निवड आपल्याला श्रेयस्कर आहे हे आपल्याला कळायला हवे. दुर्दैवाने आपण पाश्चात्यांच्या पाठी मागे धावतोय, कारण त्यात चंगळवादाला भरपूर वाव आहे. आपल्या संस्कृतीमध्ये अशा चंगळवादाला वाव नसल्याने नवी पिढी त्याकडे आकर्षित होते आहे. एक मात्र सांगावेसे वाटते की संस्कृती हा फार मोठा विषय असल्याने सात हजार वर्षांच्या संस्कृतीने अनेक स्थित्यंतरे पाहिली आहेत. त्या मानाने पाच-पंचेवीस वर्षे ही नगण्यच म्हणावी लागतील. हा आलेला आवेगाचा ओघ नक्की ओसरेल व मूळ भारतीय संस्कृतीचे अढळ स्थान तसेच राहील. त्यात कुठलाच फरक पडणार नाही असे मला वाटते. निष्कर्षाप्रत येताना मात्र आपण म्हणता तसे अविभक्त कुटुंब पद्धतीत आपण राहिलो तर आपण आपला व समस्त कुटुंबाचा विकास राखू शकतो हे माझे ठाम मत आहे, यावर माझा संपूर्ण विश्वास आहे.



**१९८८ पासून आपण ठिबक सिंचनाच्या क्षेत्रात प्रवेश करून जगाला नवी दिशा प्रदान केली आहे. १९८८ ते २०१३ हा २५ वर्षांचा रौप्य महोत्सवी प्रदीर्घ कालावधी पूर्ण झाला आहे. आपण जग जिंकलं. देशाबाहेर देशातील प्रकल्पांपेक्षा एक जादा प्रकल्प आपण उभा केला. पण महाराष्ट्रात पाण्याची परिस्थिती व लोकसंख्या आणि जमिनीचे शेतीसाठी कमी होत जाणारे क्षेत्र पाहता ठिबक अनिवार्य असताना, शासनाचाही ठिबक वापरावर भर असताना ठिबकचे सार्वत्रीकरण म्हणावे तसे झालेले नाही, यामागची कारणे काय असावीत?**

खूपच चांगला पण तेवढाच कठीण प्रश्न आहे. ठिबकची गरज आपल्या देशात जर सर्वांत जास्त कोणत्या राज्याला आहे, याचा वेध घेतला तर आपण काही राज्यांची नावे सांगू शकू. त्या आपला महाराष्ट्र, दुसरे राज्य राजस्थान, तिसरे आहे तामिळनाडू, ज्यास ठिबकची अधिक गरज आहे. तसे पाहता आंध्र प्रदेशालाही ठिबकची गरज आहेच. पण या चार राज्यात गरजेच्या दृष्टीने त्याचा क्रमांक चौथा. या चारही राज्यात ठिबकचा विनियोग झाला आहे. महाराष्ट्रात या चार राज्यांच्या तुलनेत अधिक ठिबकचा वापर होतो. त्यातल्या त्यात हे म्हणावे लागेल की केंद्र सरकारची अनुदान योजना लागू होण्याअगोदर राज्यात मा. ना. श्री. शरद पवारांनी ही ठिबकसाठी अनुदान योजना जाहीर करून लागूही केली. महाराष्ट्राचा जो राजकीय पुढारी वर्ग आहे, त्या वर्गाला ठिबकच्या लाभाची चांगली जाण आहे. परंतु शासनाचे अनुदान हे शाप की वरदान आहे, हे आता सांगता येत नाही. राजकारणविरहित अनुदान हे वरदानच होय. गुणवत्ताधारित पद्धतीने हे अनुदान पूर्वी मिळत असे. पुढे मात्र यात काही तरी बिघडलं आणि चित्र आपल्यासमोर आहे. त्याचाच परिणाम ठिबकचा वापर कमी होण्यात झाला. दुष्काळी परिस्थिती असतानाही ठिबकचा कमी वापर होणे यासारखे दुसरे दुर्दैव ते काय?

आपण म्हणतो की आज पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष आहे. मोठा प्रश्न भेडसावतो आहे. मला याबाबत एक प्रश्न आपल्यासमोर ठेवायचा आहे. या मुलाखतीच्या निमित्ताने समाजासमोर ठेवायचा आहे की, आजही एकूण उपलब्ध पाण्याच्या पंच्याहत्तर टक्के पाणी शेती वापरते. या ७५ टक्क्यांपैकी केवळ १० टक्के पाणी जरी आपण वाचवू शकलो, तरी मला वाटते की, आपली घरगुती वापरासाठीची म्हणा किंवा पिण्याच्या पाण्याची गरज व उद्योग व्यवसायासाठी लागणाऱ्या पाण्याची गरज सहज भागवू शकू. प्रश्न एवढा सोपा असताना त्याला जटील समस्येसारखे पाहण्याची गरजच नाही असे माझे प्रामाणिक मत आहे. त्यामुळे पाण्याची उपलब्धता हा प्रश्न नसून उपलब्ध पाण्याच्या व्यवस्थापनाचा हा प्रश्न आहे, असे मला वाटते. सबब पिण्याच्या पाण्याचा किंवा उद्योगासाठीच्या पाण्याचा प्रश्न हा मुळात पाणी उपलब्धतेचा नाहीच. बरं असा काहीसा प्रश्न आपल्यासमोर आहे असं मानलं, तर किमान जादा पाणी लागणाऱ्या ऊस आणि

केळीसारख्या पिकाला तरी सक्तीचे ठिबक सिंचन अनिवार्य करणे गरजेचे आहे.



ठिबकचे सार्वत्रीकरण न होण्याचे कारण म्हणजे शासकीय योजना जिथे आल्या, तिथे प्रगतीचा वेग कमी होऊन जातो. त्याचे कारण म्हणजे अंमलबजावणी स्तरावर कुठेतरी राहणाऱ्या त्रुटी होत. त्रुटी राहिल्या की मग चांगल्या योजनेचेही तीन तेरा वाजतात. त्यामुळेच की काय विद्यमान कृषिमंत्री यांनी आता थेट शेतकऱ्यांच्या हातीच अनुदान देण्याचा निर्णय जो घेतला आहे, या मताशी मी शंभर टक्के सहमत आहे. अनुदान दुसऱ्यांना देण्यापेक्षा सरळ, थेट शेतकऱ्यांना द्यावे हे उत्तमच, परंतु ते द्यावे ना? वित्त वर्ष २०१२-१३ मध्ये केंद्रशासनाच्या निर्णयानंतरही एकही नवीन ठिबकसाठी अनुदान शेतकऱ्यांपर्यंत पोहचलेले नाही, हे वास्तव आहे. जुने पैसे देण्याचे काम मात्र चालू आहे. तेही अजून पूर्ण झालेले नाही. तेव्हा शेतकऱ्यांच्या हितासाठी ठिबक अनुदान निधीचे प्रावधान असणे गरजेचे आहे. बजेटमध्ये २० टक्के सिंचनासाठी अनुदान लिहिणे मोघम स्वरुपाचे वाटते. मग हे सिंचन म्हणजे कोणतं सिंचन? प्रवाही सिंचन की ठिबक सिंचन याचा खुलासा होत नाही. दुर्दैवाने अशा प्रकारे जर आपण नियोजन करू शकलो नाही, तर महाराष्ट्राला आजच्यापेक्षा वाईट दिवसांना सामोरी जावे लागेल असे प्रामाणिकपणे वाटते.

माझा व्यवसाय म्हणून सांगत नाही, तर गेली २५-३० वर्षांपासून मी या क्षेत्राला माझे जीवन वाहिलेले आहे, की सर्वत्र सूक्ष्म सिंचनाचा प्रसार व्हावा. पुढे त्यातल्या त्यात माझ्या राज्यात अधिक व्हावा यासाठी मी सक्रीय राहिलो आहे. सर्वांनी मला जेव्हा जेव्हा गरज होती, तेव्हा मदतही केली आहे. परंतु आज चित्र निराळं आहे.

मी तसा आशावादी आहे. आज न उद्या हे सारं बदलेल असं मला वाटतं. ठिबक सर्वत्र दिसेल, परंतु त्यासाठी बराच अवधी द्यावा लागेल असं दिसतंय. आज त्याची गरज असल्याने त्यावर बोललं खूप जातंय, आम्ही मात्र खूप आधीपासून, म्हणजे जेव्हा फारशी पाण्याची टंचाई जाणवत नव्हती तेव्हाही या विषयावर बोलत होतो, आज गरजेच्या वेळीही बोलत आहोत आणि पुढेही बोलत राहू.



**आपण ठिबक-तुषार बद्दल बोलतो आहेच. यासोबत आपणाशी सुसंवाद साधण्यामध्ये एक आणखी महत्त्वाचा विषय म्हणजे पाणलोटक्षेत्र विकास हा आहे. पाणलोटक्षेत्र विकास हा शासनाच्या देखील ध्यासाचा विषय आहे. जैन हिल्सवर आपण जे एक मॉडेल तयार केले आहे, ते इतरत्रही का नसावे हा प्रश्न काळजात घेऊन पाणलोटविकास प्रश्नांची काळजी कायमची मिटावी असं सामान्य नागरिक म्हणून जेव्हा माझ्या-सारख्याच्या मनात येतं. कवी डॉ. राजेंद्र मालोसे यांनी म्हटल्याप्रमाणे आपण 'स्वप्नवेडा' होऊन या उजाड माळरानाला हिरवाईचे हास्य दिले, त्याने तुम्हाला जीवनभरची प्रसन्नता दिली. इथे पाणी-माती अडवा व पाणी जिरवा हा प्रयोग आपण यशस्वी केलाय. आपली प्रचंड साठ्याची शेततळी, बांध या माध्यमातून आपण पावसाचा एक थेंबही बाहेर जाऊ देत नाही. आपण जे केले ते गावनिहाय घडण्यासाठी काय करावे लागेल?**

महाराष्ट्र शासनाने याबाबत फार मोठे काम करून ठेवले आहे. जवळजवळ ५८० लघुसंधारणाचे प्रकल्प कुठे असावेत, कसे असावेत, तांत्रिकदृष्ट्या ते कसे योग्य

आहेत याबाबत आपण म्हणता तसा अभ्यास शासनाने केला आहे. पण या प्रकल्पांना प्रत्यक्ष कामासाठी लागणारे जे भांडवल आहे, ते वेळोवेळी निधीअभावी उपलब्ध होऊ शकलेले नाही. केवळ प्रशासकीय किंवा ज्यास आपण आस्थापना म्हणून तेवढाच निधी उपलब्ध होऊ शकला. त्यामुळे हे काम ज्या गतीने व्हायला पाहिजे आणि ज्या व्यापकतेने व्हायला पाहिजे, ते होऊ शकलेले नाही.



जेव्हा आपण जलसंधारण किंवा वॉटर कॉन्झर्व्हेशनबद्दल बोलू, तेव्हा त्यातच मृदा संधारण (सॉईल कॉनव्हिंशन), ग्रीनरी इत्यादी निहितच आहे. हे जर आपण करू शकलो व हे पाणी आपण ठिबकच्या माध्यमातून वापरू शकलो तर त्याला सस्टेनेबल प्लानिंग म्हणता येईल. शाश्वत किंवा लांबच्या पल्ल्याचे नियोजन म्हणता येईल. आता पाऊसच पडला नाही, तर आपण काय करणार? पण पडलेल्या पावसाचा थेंब न थेंब अडवून तो सूक्ष्म सिंचनाकरिता वापरला तर आपल्याला पाण्याच्या समस्येला कधीही तोंड देण्याची वेळ येणार नाही.



जलसंधारणाच्याबाबत मात्र एक नक्की की, जे छोटे छोटे प्रोजेक्ट आहेत, त्याचा खर्च मोठ्या धरणाच्या किंवा मोठ्या प्रकल्पाच्या गुणोत्तराच्या प्रमाणाने जास्तच येतो. उदाहरणादाखल सांगायचे तर एखाद्या मोठ्या धरणासाठी आपल्याला १० पैसे प्रतिलिटर एवढा खर्च येत असेल तर जलसंधारणासाठीच्या छोट्या प्रकल्पांसाठी तोच खर्च २५ ते ५० पैसे प्रतिलिटर येतो हे देखील लक्षात घेण्यासारखी बाब आहे.




म्हणजे जलसंधारणातून मिळालेले पाणी हे स्वस्त पाणी नव्हे तर महागडे पाणी आहे. परंतु हे महागडे पाणीही परवडू शकेल, केव्हा? तर जेंव्हा हे महागडे पाणी वापरून आपण सूक्ष्म सिंचनाचा मार्ग काटेकोरपणे अवलंबिला तरच! अगदी कोरडवाहू शेती करण्यासाठी सुद्धा मग असे करणे म्हणजे आशेचे किरण ठरतील.

धरण बांधकाम व वितरणाची जी व्यवस्था आज प्रचलित आहे, त्यात आपण पाहतो की, धरणाच्या वरच्या भागातूनच पाण्याचा प्रवाह आरंभ होऊनही तेथील शेतकरी पाण्यापासून वंचित राहतात. खालच्या भागाला पाणी मिळते. तसेच धरणाचा एक भाग ज्याला तुम्ही



कमांड किंवा लाभक्षेत्र म्हणता तो हिरवा दिसतो, तर दुसऱ्या भागाला मात्र पाणी दिसतं. पण मिळत नाही. या तांत्रिक व्यवस्था आहेत, पण शेवटी त्या मानवनिर्मितच, निसर्गनिर्मित नव्हे.

मग शासनाच्या नव्या कायद्यातील समन्यायाचा विचार करता जर दोन्ही भागास सुसंपन्नता आणावयाची असेल तर काही गोष्टी नक्की करता येतील. पहिली म्हणजे बाष्पीभवन कमीत कमी कसे होईल याबाबत विचार करून सुयोग्य व्यवस्था निर्माण करणे, दुसरे म्हणजे कालव्यातून विसर्गाचे पाणी मुळीच झिरपणार नाही अशी चोख व्यवस्था करावी किंवा बंद पाईपमधून कालव्याचे पाणी सोडावे. अगदी शेतावरील उघड्या चाऱ्यासुद्धा बंद पाईपच्या असाव्यात. आपण हे जोवर करीत नाही, तोवर राज्याला पाण्याचे मानवनिर्मित दुर्भिक्ष जाणवणारच.




**काळाचे ज्ञान आणि वेळेचे भाग हे तत्त्व आपण जीवनभर राखलेले आहे. इथल्या गांधीतीर्थ इमारतीच्या एका दालनातही घड्याळ आणि त्याखाली पाण्याच्या साहाय्याने वेळ मोजण्याचे यंत्र ठेवून आपण ही भूमिका व्यक्तही केली आहे. या भूमिकेला अनुसरून जैन हिल्सवरील कांदा निर्जलीकरणाच्या प्रकल्पाकरिता आपण करार शेती पद्धतीचा अवलंब यशस्वीपणे करीत आहात. सामुहिक शेतीचा आमचा इतिहास प्राचीन आहे. धुळे भागातील फड पद्धती त्याचे एक स्वरुप आहे. मग आज पुन्हा सामुहिक शेतीसाठी अनुकूल वातावरण आहे असे समजायचे का? तसेच करार शेतीने साफल्य आणि समृद्धी मिळविता येते का? आपली मते काय?**

हे बघा, सामुहिक शेती म्हणजेच एक प्रकारची सहकार तत्त्वावरील शेती. हा प्रयोग झाला आणि तो अयशस्वी सिद्ध झाला. पं. जवाहरलाल नेहरूंचे म्हणणे असे होते की, सहकार तत्त्वासाठी काही किंमत मोजावी लागेल, पण सहकार तत्त्व पुढे न्यायलाच हवे. असे म्हणा की त्यांचा आग्रह होता. माझे मात्र वैयक्तिक मत असे की सामुहिक शेतीपेक्षा करार शेतीचा पर्याय अधिक व्यावहारिक ठरतो. करार शेती पद्धतीमध्ये मालकी मूळ भूधारकाकडेच राहते. त्या मूळ मालकाला तांत्रिक रसद पुरविण्याचे काम करार करणारे अभिकरण करीत असते. परंतु सहकारी शेती म्हणजे सगळ्यांची शेती असल्यामुळे ती कुणाचीची शेती राहत नाही. इथे तो त्याची शेती आहे म्हणून तो बघत असतो. करार शेतीत मूळ मालकी असणाऱ्या शेतकऱ्याला अपेक्षेपेक्षा जास्त उत्पादन झाले की तो करारानुसार ठरलेल्या दराप्रमाणे आपला माल करार ज्याचेसोबत केलेला आहे, त्या व्यक्तिस, संस्थेस किंवा कंपनीस द्यायला विनातक्रार तयार होतो. परंतु उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी झाले आणि मालाची बाजारात किंमत वाढलेली असेल तर मात्र करार करूनही शेतकरी तुम्हाला टांगत ठेवतात आणि मार्केटमध्ये माल विकायला पाठवतात.

**यावर उपाय काय?**

वरील समस्येवर आम्ही सुवर्णमध्य असा काढला की, शेती मालकाचे उत्पन्न कमी झाले आणि बाजारात किमत जास्त असेल तर थोड्या फार फरकाने वाढीव किमत देऊ आणि बाजारात जर किंमत कमी असेल तर कराराप्रमाणे जास्त किमत देऊ. हे जे आम्ही करार शेतीत नावीण्य आणले, तसे भारतात तरी कोणत्या कंपनीने धारिष्ट केलेले माझ्या पाहण्यात किंवा ऐकिवात नाही. यामध्ये शेतकऱ्याचा दोन्ही दृष्टीने नफा असल्याने आमच्या कंपनीची करार शेती यशस्वी राहिली आहे. अन्यथा करार शेतीमध्ये समस्या येऊ शकतात. तुमच्या माहितीसाठी सांगतो की बाजारभाव आणि कराराभाव यातील फरकामुळे आम्हाला दोन-तीन वेळा चांगलाच नुकसानीचा फटका बसला आहे.

**नुकसान होऊनही आपण समाधानी कसे?**

अगदी ५० लाख ते १ कोटीपर्यंतची ही नुकसान आम्ही तीन ते चार वेळा सहन केली. ती एकाच तत्त्वावर

की, कराराला आपल्याला जागायचे आहे. याचा परिणाम असा झाला की, शेतकऱ्यांच्या मनामध्ये आमच्या कंपनीबाबत एवढा विश्वास निर्माण झाला की, आता आम्हाला शेतकरी उत्स्फूर्तपणे करारपद्धतीच्या शेतीसाठी सहकार्य करतात. त्यांना ही खात्री झाली की बाजारात किंमत घटली, तरी आपल्याला करारानुसार जादा असलेली किंमत मिळते, तर बाजारभाव वधारले तर त्याप्रमाणात जैन इरिगेशन आपले नुकसान होऊ देणार नाही. हा विश्वास जिंकण्यासाठी आम्ही ३ कोटींची किंमत मोजली, कारण शेतकऱ्यांच्या भल्यातच आपले कुठेतरी भले आहे,हे माझ्या मनात पक्के गृहीत आहे. यावर माझा ठाम विश्वासही आहे आणि श्रद्धाही. मला वाटते त्यामुळेच करार शेतीमध्ये आम्ही यशस्वी ठरलो. बाकीची मंडळी यात का अग्रेसर नाहीत याची कारणे मात्र मला सांगता येणार नाहीत. मी मात्र असे ठरविले आहे की, अशाप्रकारे करारशेती चालू शकते.

**आपण इथे बायोगॅसद्वारे १.७ मेगॅवॅट आणि सौरशक्तीद्वारे ८.५ मेगॅवॅट एवढी उर्जा निर्माण करण्याची प्रचंड व्यवस्था निर्माण केली आहे. राज्यपातळीवरील वीजेच्या टंचाईचा, लोडशेडिंगचा काळ असताना या दोन प्रकारचा अवलंब केल्यास शेतकरी आत्मनिर्भर होऊ शकेल. हे पर्याय सामान्य शेतकऱ्यांना परवडतील किंवा कसे?**

प्रत्येक शेतकऱ्याने सौर उर्जेचा अवलंब केला तर विजेची उपलब्धता हा प्रश्न सर्वार्थाने सुटेल. शेतकरी जिथे आला, तिथे शासन मदतीला धावतंच. असे कुठेही उदाहरण नाही, की जिथे शासनाच्या मदतीशिवाय शेतकरी मोठा झाला आहे. अगदी अमेरिकेत देखील नाही. एखादा दुसरा अपवाद सोडून द्या. भांडवली गुंतवणूक हा आमच्या देशातील शेतकऱ्यांसमोरील यक्ष प्रश्न आहे. त्याच्याजवळ गुंतवणूकीसाठी एवढे भांडवल नाही, ताकद नाही आणि भांडवल कोठून एकत्र करण्याचे त्याने ठरविले किंवा जमले तरी त्या कर्जाची, उसणेवारीची परतफेड करण्याचे सामर्थ्य त्याचेजवळ खचितच नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागील हे एक प्रमुख कारण असावे असे मला वाटते. त्यामुळे शासनाच्या मदतीची अपेक्षा केल्यापेक्षा आता समाजानेच ही गोष्ट लावून धरली पाहिजे, धसास लावली पाहिजे. विजेचे दर सातत्याने वाढणार, त्यातही लोड शेडिंग होणार यापेक्षा शासनाने एकदाच काय ती मदत द्यावी आणि शेतकऱ्याने समाजपाठबळावर पुढे जावे हेच बरे.

एक मात्र खरे की, भारतात असो वा जगात इतरत्र कोणत्याही देशात शासकीय मदतीखेरीज ठिबक तुषार किंवा बायोगॅस-सौर उर्जा या प्रकल्पांना बळही येणार नाही आणि प्रसारही होणार नाही. स्पेनचे उदाहरण घेतले तर स्पेनने शेतकऱ्यांना मदत करण्यामध्ये भारी तोटा सहन केला, शेवटी ती संकल्पनाच विराम पावली, मोडकळीस आली. जर्मनीमध्ये शासनाने शेतकऱ्यांना वीज निर्माता बनविले ते असे की शेतकऱ्याने वीज तयार करायची. आवश्यक तेवढी वापरून उरलेली शासनाला विकायची. हा प्रयोगही केवळ १५ वर्षेच तग धरू शकला. पुढे हा प्रयोग कमी करावा लागला.

आता सौर उर्जानिर्मितीचा खर्च कमी झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यासाठी जर भांडवल उपलब्धता करून दिल्या गेली तर योग्य वेळी योग्य काम केल्याचे पुण्य आपल्याला लाभणार आहे. आता हे पुण्य घ्यायचे का नाही हा आपला भाग, पण लाभणार हे नक्की सांगू शकतो, कारण त्यातील मी एक आहे.



**जैन हिल्सवर आपण अत्यंत कल्पकरित्या सर्जनशीलतेने उभारलेल्या गांधीतीर्थाचे दर्शन घेतल्यानंतर जे जाणवलं, ते असं की एक तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील हे महात्माजींचे स्मारक असल्याने प्रचंड पर्यटकांचा लोंढा जैनहिल्सकडे येण्याचे आणखी एक निमित्त निर्माण झाले आहे. दुसरे म्हणजे शेतीविषयक गांधीजींच्या आंदोलनांची सविस्तर व वेधक वास्तवाधारित माहिती या गांधीतीर्थात मिळते. विशेष म्हणजे भारताच्या तत्कालीन राष्ट्रपती मा. श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या शुभहस्ते या स्मारकाचे उद्घाटन झाले आहे.**

**गांधीतीर्थास भेट देणाऱ्यानी एक तरी गांधीतत्त्व पाळण्याचा संकल्प करावा एवढे सामर्थ्य असणाऱ्या गांधीतीर्थाच्या निर्मितीमागील आपली भूमिका काय?**



आपण पाहत आहात की माझ्या कार्यालयात मी जिथे बसतो, तिथे भिंतीवर वरील बाजूस तीन प्रतिमा आहेत व त्याखालील रांगेत आणखी तीन प्रतिमा आहेत. आई-वडील यांनी मला जन्माला घातलं. ही सृष्टी पाहण्याची संधी मला त्यांचेमुळे लाभली. आई-वडिलांसोबत माझ्या दिवंगत पत्नीची प्रतिमा आहे, जिने माझ्यासाठी नवी सृष्टी निर्माण केली.

या प्रतिमांच्या खालती आपण पाहताय की, पहिला फोटो आहे गांधीजींचा. जीवन जगावं कसं हे त्यांच्याकडे पाहून मी शिकलो. दुसरा फोटो आहे, जे. आर. डी. टाटांचा, ज्यांनी माझ्यापुढे सामाजिक बांधिलकी ठेवूनही उद्योग यशस्वीपणे करता येतो, हा आदर्श माझ्यापुढे ठेवला. तिसरा फोटो आहे पं. जवाहरलाल नेहरूंचा. नेहरूंचा फोटो यासाठी की माणसाने जीवनात मोठी मोठी स्वप्ने पहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी आपलं आयुष्य कसं वेचावं याचे ते मूर्तिमंत उदाहरण होत. या तीन महान विभूतींमुळे माझे जीवन घडले असे माझे मत आहे.

महात्मा गांधींविषयी पहिल्यापासून माझ्या मनात विलक्षण प्रेम आहे. कारण या माणसाने स्वत:कडे बघून जग निर्मिती करायचे ठरविले नाही तर जगात जिथे जिथे अश्रू आहेत, ते पुसरण्यासाठी तो त्यांच्यासारखा झाला. आपल्या देशामध्ये गरीबांना अंगावर घालण्यासाठी कपडेही नाहीत, हे जेव्हा त्यांनी पाहिले, तो प्रसंग सांगतो. एका पाझर तलावाच्या काठी एक महिला कशीबशी लज्या राखण्यासापुरतेच वस्त्र वेढून होती. हे जेव्हा महात्माजींनी पाहिले, तेव्हा त्यांनी उंची वस्त्राचा, अंगभर कपड्यांचा त्याग केला. हा माणूस वेगळा होता. याने दुसऱ्याप्रमाणे जगायचं ठरवलं. दुसऱ्याने आपल्यासारखं जगावं असा हट्ट धरला नाही. म्हणून मला सांगावसं वाटतं की जीवन जगायचं असेल तर समाजजीवनात गांधीजीएवढे आदर्श जीवन तुम्हाला इतरत्र कुठे पहायला मिळणार नाही. पुढच्या पिढीसाठी आपण काय केलं हे वर गेल्यावर आपल्याला विचारल्या जाईल या भूमिकेतून पुढच्या पिढीसाठी मी काहीतरी केले आहे. माझ्यासाठी मी हे केलेले नाही. एक ठेवा निर्माण केला. शेकडो वर्ष जे अबाधित राहील. कदाचित कधी भावी काळात धरणीकंप झालाच तर माझ्या घराला नुकसान पोचू शकेल, परंतु गांधीतीर्थास काहीही होणार नाही अशी आम्ही डिझाईनच्यावेळी काळजी घेतली आहे.

गांधीतीर्थ म्हणजे महात्माजींच्या विचारांचे, कार्याचे सदैव अखंडपणे स्मरण करणारी ही पवित्र वास्तू होय. हा माझा गांधीतीर्थ निर्माण करण्यामागे हेतू आहे. ईश्वराने याच कारणासाठी माझे जीवन जरासे लांबविले आहे व बोनस जीवन दिले आहे. अशी माझी धारणा, श्रद्धा, निष्ठा आहे. महामहीम मा. श्रीमती प्रतिभाताईनीही मला हेच सांगितले की भंवरलालजी, जगात तुम्ही खूप मोठी कामे केली, जागतिक पुरस्कार मिळविलेत, मानसन्मान मिळविले, ठिबक तुषारचा प्रचार-प्रसार केला, परंतु यापुढे आपल्याला जगात ओळखले जाईल ते गांधीतीर्थाचे सृजक निर्माते म्हणूनच. कांताबाईचा पती आणि गांधीतीर्थाचा निर्माता अशी माझी दोन प्रकारे ओळख जगाला रहावी अशी माझीही इच्छा आहे. महात्मा बुद्ध, महावीर यांच्यानंतर गांधीसारखी विभूती कुणी झालेली नसल्याने अशा विभूतीचा विचार नव्या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जगातील आबालवृध्दांपर्यंत सहज गांधीजींचे विचार पोहचतील असा या स्मारकाच्या माध्यमातून आम्ही प्रयत्न केला






।। पाटवारी आपली जीवनदारी । तिची ठेवूया उत्तम साफ सफाई ।।

## पद्मश्री डॉ. भंवरलाल जैन यांना मिळालेले काही पुरस्कार आणि मानसन्मान

**राष्ट्रपती पुरस्कार**

१. उद्योगपात्र पुरस्कार - १९८२
२. मार्केटिंग पुरस्कार - १९८३
३. उद्योग विभूषण पुरस्कार - १९९२
४. फाय फाऊंडेशन पुरस्कार - १९९५
५. सोशल जस्टीस पुरस्कार - २००२
६. जलसंरक्षक पुरस्कार - २००७

**पदव्या**

१. डॉक्टर ऑफ सायन्स (कोकण विद्यापीठातर्फे)
२. डी.लिट् (उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे)
३. डॉक्टर ऑफ सायन्स (एमपीयुएटी, राजस्थान)
४. डॉक्टर ऑफ सायन्स (तामिळनाडू विद्यापीठ)
५. पद्मश्री पदवीप्रदान (भारत सरकार)





**आंतरराष्ट्रीय बहुमान / पुरस्कार**


१. मास्टर ब्रुव्हर्स असो. ऑफ अमेरिका मानव सदस्यपद - १९८०
२. क्रॉफर्ड रीड मेमोरियल अॅवार्ड - १९९७
३. इस्त्राएल ट्रेड अॅवार्ड - १९९६
४. इ.आय.एम.ए. टेक्निकल इनोव्हेशन अॅवार्ड - २००५

**उद्योग पुरस्कार**

१. केमिक्सील अॅवार्ड - ३ वेळा
२. सर्टिफिकेट ऑफ एक्सलन्स - ३ वेळा
३. सर्टिफिकेट ऑफ मेरिट अॅवार्ड - १९९२
४. प्लेक्स कॉन्सिल अॅवार्ड - ६८ वेळा
५. डी.एस.आय.आर.अॅवार्ड - २ वेळा
६. अपेडा अॅवार्ड - ३ वेळा
७. नॅशनल एक्स्पोर्ट अॅवार्ड
८. मार्केटिंग पुरस्कार - १९८३
९. रबप्लास्ट अॅवार्ड
१०. मार्केटिंग चॅम्स अॅवार्ड
११. नल्ल वझार्ड अॅवार्ड
१२. जमनालाल बजाज पुरस्कार
१३. आसीएसएसइ अॅवार्ड
१४. गोल्डन पिकॉक अॅवार्ड
१५. क्लिन टेक अॅवार्ड (पर्यावरणाबाबत)
१६. ग्रीन टेक एन्हायर्नमेंट एक्सलेन्स गोल्ड अॅवार्ड
१७. सीइयु अॅवार्ड
१८. निर्यातीबद्दल प्लेक्स कॉन्सिल पुरस्कार
१९. एआयपीयुबी फेलोशिप अॅवार्ड

**इतर सन्मानाचे पुरस्कार**

१. ए.आर.भट एंटरप्रिनरशीप अॅवार्ड - १९८४
२. वसंतराव नाईक कृषि ग्रामीण विकास पुरस्कार - १९९७ व ९८
३. AISM यशवंतराव चव्हाण अॅवार्ड - २००६
४. अॅग्रोटेक्नॉलॉजी रत्ना पुरस्कार
५. राजीव गांधी पुरस्कार - २००८




# जैन एकात्मिक सुक्ष्म सिंचन प्रणाली


## सिंचन क्षेत्रात जैन इरिगेशनचा अजून एक नविन क्रांतीकारी पायंडा !





### जैन एकात्मिक सुक्ष्म सिंचन योजना: दाब व गुरुत्व (Gravity) नियंत्रित वितरण प्रणाली मॉडेल





### जैन एकात्मिक पाईप सिंचन : संपूर्ण गुरुत्व (Gravity) नियंत्रित मॉडेल




### जैन एकात्मिक सुक्ष्म सिंचन योजना: दाब नियंत्रित वितरण प्रणाली मॉडेल




### जैन एकात्मिक सुक्ष्म सिंचन योजना: कालवा आधारीत मॉडेल




### जैन एकात्मिक सुक्ष्म सिंचन : उपसा सुक्ष्म सिंचन मॉडेल

- शेतीसाठी लागणा-या पाण्याची वापर कार्यक्षमता प्रचलीत पध्दतीत ३५ % आहे जैन एकात्मिक सुक्ष्म सिंचन प्रणालीने ती कार्यक्षमता ९५ % पर्यंत मिळते
- पारंपारीक योजनांपेक्षा या प्रणालीत सिंचन क्षेत्रात १०० % पर्यंत वाढ होते
- पाणी वाटप समन्यायी होते
- ५० टक्के पर्यंत विजेची बचत होते
- उत्पादनात लक्षणीय वाढ होते
- खते व मजुरीत भरघोस बचत
- जमिनीचा पोत कायम संतुलीत राहतो.
- शेतक-यांना अधिक नफा मिळतो.
- जमिन अधिग्रहण व त्यासाठीचा वेळ / खर्च तसेच शेतक-यांना विस्थापीत करण्याची गरज नाही
- प्रकल्प उभारणी व पूर्णत्वास नेणे अल्प कालावधीत शक्य होते
- ठोस मृदसंधारण साधले जाते
- देखभाल व दुरुस्ती खर्चात कमालीची कपात
- देश / विदेशात लाखो एकरांवर यशस्वीपणे कार्यरत
- भारतात या पध्दतीची टर्न की प्रणाली १०० ते हजारो एकरापर्यंत शेतकरी, समूह ,संस्था ,शासन यांचे गरजेप्रमाणे संकल्पना ते कार्यान्वित करणारी एकमेव कंपनी

**जैन एकात्मिक सुक्ष्म सिंचन योजनेचा अवलंब करणे म्हणजे शेतक-यासाठी उज्वल भविष्याची शाश्वती आहे!**

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि
कल्पना कणापरी, ब्रम्हांडाचा भेद करी

अधिक माहितीसाठी संपर्क :
जैन प्लास्टिक पार्क, पो.बॉ. ७२, जळगांव. फोन: ०२५७-२२५८०११; फॅक्स: ०२५७-२२५८१११; ई-मेल: jisl@jains.com; वेबसाईट: www.jains.com,
मोबाईल: ९४२२२७५०७६, ९४२२७७२२५३, ९४२२७७६८१३, ९४२२२९२१०८


महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या वतीने 'महाराष्ट्र सिंचन विकास' हे त्रैमासिक मुद्रक, संपादक व प्रकाशक श्री. अ. कि. सुरुशे यांनी विविध सेवा, पुणे-४११ ००२ येथे छापून अ. अ. व संचालक, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, ८, मोलेदिना रोड, पुणे - ४११ ००१ येथे प्रकाशित केले.

सकल समृद्धीचा संकल्प